## -: प्रेसनोट दिनांक - २०/०४/२०२३ :-

**आरोपी लोकसेवक सोमनाथ देवराम चळचुक, वय - ४८ वर्षे, सहायक पोलीस फौजदार, नेमणुक जयसिंगपूर पोलीस ठाणे जि.कोल्हापूर रा. श्री महादेव कोळी यांचे घरी भाडयाने १६ नं.गल्ली, विजयमाला नगर, जयसिंगपूर, मुळ रा. बाडगी, ता.पेट, जि.नाशीक यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार यांनी मंहिन्द्रा फायनान्स चे लोन घेवुन चारचाकी ओमनी व्हॅनघेतली होती. ती आमनी व्हॅन त्यांनी उमळवाड येथील त्यांचे मित्राला विकली होती. सदर गाडीवर असलेले फायनान्स चे हप्ते भरणेसाठी तक्रारदार त्यांचे मित्राला वारंवार संपर्क करीत होते. परंतु त्यांचे मित्राने फायनान्स चे हप्ते न भरता सदरची ओमनी गाडी परस्पर व्यवहार करून कोणाला तरी विकली म्हणुन तक्रारदार यांनी त्यांचे मित्राचे विरूध्द कारवाई होवुन त्यांची गाडी परत मिळावी म्हणुन जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे अर्ज केला होता. सदर अर्जाप्रमाणे कारवाई करून अर्जदार यांना त्यांची ओमनी कार परत मिळवुन देणेकरीता जयसिंगपूर पोलीस ठाणे येथील सहायक पोलीस फौजदार चळचुक यांनी १५०००/- रूपये द्यावे लागतील अशी मागणी केली.

दिनांक २०/०४/२०२३ रोजी तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचेकडे तक्रार अर्ज दिला. तक्रारीप्रमाणे दिनांक २०/०४/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये **आरोपी लोकसेवक सोमनाथ देवराम चळचुक, सहायक पोलीस फौजदार, नेमणुक जयसिंगपूर पोलीस ठाणे यांनी** तक्रारदार यांचे ओमनी कार चे बाबत दिले अर्जावर कारवाई करणेसाठी व तक्रारदार यांनी त्यांची ओमनी कार परत मिळवुन देणेकरीता तक्रारदार यांचेकडे प्रथम १५०००/- रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती १००००/- रूपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक **सोमनाथ देवराम चळचुक, सहायक पोलीस फौजदार, नेमणुक जयसिंगपूर पोलीस ठाणे** यांनी १००००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना पकडणेत आले आहे.

सदरबाबत **सोमनाथ देवराम चळचुक, सहायक पोलीस फौजदार, नेमणुक जयसिंगपूर पोलीस ठाणे** यांचेविरूध्द जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, संजीव बंबरगेकर, पोलीस उपनिरीक्षक, प्रकाश भंडारे, सहायक पोलीस फौजदार, पो.हे.कॉ. विकास माने, पो.ना. सचिन पाटील पो.कॉ.मयुर देसाई, चा.पो.हे.कॉ. सुरज अपराध, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**